महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२३/ २६१ दिनांक : 17 JAN 2023

प्रति,
प्राचार्य,
सर्व व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

**विषय : - शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या शैक्षणिक शुल्क मंजूरीबाबत...**

संदर्भ :- १. मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. शुनिप्रा/२४/२०२३, दि. ०४/०१/२०२३.
२. शासन निणर्य क्र. ईबीसी/२०१८/प्र.क्र.३२६/तांशि-४, दि. ३०/१०/२०१८.
३. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२३/०६, दि. १२/०१/२०२३.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या शैक्षणिक शुल्काबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानूसार शुल्क नियामक प्राधिकरणाने पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता No Upward Revision बाबत सूचना निर्गमित केलेली आहे. संस्थांनी शुल्क नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर www.mahafra.org याबाबतच्या निर्देशांचे अवलोकन करावे व त्यानूसार कार्यवाही करावी.

त्याअनुषंगाने ज्या पदविका संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंत शुल्क नियामक प्राधिकरणाकडून (FRA) शैक्षणिक शुल्क मंजूर करुन घेतलेले आहे व अशा संस्थांना जर, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता शैक्षणिक शुल्कात वाढ न करता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे शैक्षणिक शुल्क कायम ठेवावयाचे असेल तर अशा संस्थांनी तशा प्रकारचे विनंती पत्र संस्थेच्या लेटर हेडवर प्राचार्यांच्या सही शिक्यासहित या कार्यालयास तात्काळ सादर करावे.

संस्थांनी, संस्थेच्या लेटर हेडवर प्राचार्यांच्या सही शिक्यासहित विनंती पत्र सादर केल्या नंतरच संबंधित संस्थांचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता शैक्षणिक शुल्क महाडीबीटी पोर्टलवर या कार्यालयाकडून मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सोबतः- वरील प्रमाणे

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

F/C

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे**

क्रमांक :- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२३/ 06
दिनांक :- 12/01/2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

**विषय** :- पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता No Upward Revision चा पर्यायबाबतची लिंक ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध नसल्याबाबत.
संदर्भ: - शुल्क नियामक प्राधिककरण यांची दि. ४/०१/२०२३ रोजीची वेबसाईटवरील **सुचना**

सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, उपरोक्त सोबत जोडलेल्या शुल्क नियामक प्राधिकारण यांनी त्यांच्या वेबसाईटवर (www.mahafra.org) पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता No Upward Revision बाबत सुचना निर्गमित केलेली आहे. त्याचे अवलोकन करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी. व त्या सुचनामध्ये No Upward Revision शुल्काचा पर्याय निवडायचा असल्यास संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करावा असे कळविण्यात आले आहे.

डीबीटी पोर्टलवर पदविका अभ्यासक्रमांची संस्थेची फी ही शुल्क नियामक प्राधिकरण यांचे लॉगीनव्दारे संबंधित विभागीय कार्यालयामार्फत मंजूर करण्यात येत असल्याने No Upward Revision शुल्काचा पर्याय निवडायचा असल्यास संस्थांनी संचालनालयाकडे पत्रव्यवहार न करता संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचेकडे पत्रव्यवहार करण्याबाबत सुचित करावे. तसेच संबंधित विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या संस्थांकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता पदविका अभ्यासक्रमांकाच्या शुल्काचे No Upward Revision बाबत लेखी पत्र घेऊन डीबीटी पोर्टलवर संस्थेची पदविका अभ्यासक्रमा-साठीची फी मंजूर/नामंजूर बाबत कार्यवाही करावी. जेणेकरुन संस्थांना डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांच्या भरलेल्या अर्जावर कार्यवाही करता येईल.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १० यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हेव्यवसाय-ज्ञान यज्ञ"

शासकीय तंत्र निकेतन इमारत,
रूम नं. ३०५, ३ रा मजला, खेरवाडी,
बांद्रा, मुंबई-४०००५१

E-mail: fra.govmh@gmail.com
Website: www.mahafra.org
दुरध्वनी: ०२२-३१९८०३४८
८८२८०७८६२६४

क्रमांक : शुनिप्रा/ 24 /२०२३ दिनांक : 04 JAN 2023

## सूचना

वाचा : दि. १६/११/२०२२ चे शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्तांत.

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्याकडून प्राप्त झालेल्या दि. ९/११/२०२२ च्या पत्रानुसार प्राधिकरणाने दि. १६/११/२०२२ च्या बैठकीत मुद्दा क्र. २ च्या घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करीता अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका महाविद्यालय, औषधनिर्माणशास्त्र पदविका महाविद्यालय व हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका महाविद्यालयांचे शुल्क निर्धारणासाठी दि. ७/१०/२०२२ ते ३१/१२/२०२२ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव भरण्याकरीता लिंक सुरु करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पुढील शैक्षणिक वर्षाकरीता (२०२३-२०२४) शुल्क निर्धारणाकरीता वेगळी समिती गठीत करण्यासंबंधी शासन स्तरावर कार्यवाही सुरु असल्याचे दि. ९/११/२०२२ च्या पत्रामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

सदर पदविका अभ्यासक्रमांची शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करीता लिंक सुरु केल्यानंतर बऱ्याच विनाअनुदानित संस्थांना No Upward Revision चा पर्याय निवडायचा आहे. परंतू No Upward Revision चा पर्याय ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध नसल्या कारणाने तसा पर्याय उपलब्ध करुन मिळावा याकरीता संस्थांकडून विनंती करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने सर्व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना निदर्शनास आणण्यात येत आहे की, सदर पदविका अभ्यासक्रम हे शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२५२/तांशि-४, दि. ५/७/२०१८ नुसार "व्यावसायिक शिक्षण" (Professional Education) या व्याख्येतून वगळण्यात आलेले आहे तसेच पदविका अभ्यासक्रम विद्यापिठाशी संलग्न नसल्याने महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतुदी

लागु होत नाहीत. अशा अभ्यासक्रमांच्या संस्था शुल्क नियामक प्राधिकरणाच्या कक्षेत येत नाहीत. त्यामुळे संबंधित संस्थांच्या अभ्यासक्रमांच्या संस्थांचे पर्यायी व्यवस्था होणे अपेक्षित आहे. करीता शासन निर्णय क्र. ईबीसी-२०१८/प्र.क्र.३२६/तांशि-४ दि.३०/१०/२०१८ नुसार सदर अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारणाबाबत शासन निर्णय काढण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाच्या शासन निर्णयामध्ये स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, ज्या संस्थांचे शुल्क शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व त्यापूर्वी शुल्क निर्धारण, शुल्क नियामक प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात आलेले आहे अशा संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्यापुढील कालावधीकरीता **अधिक शुल्काची मागणी केल्यास केवळ** अशा संस्थांचे शुल्क निर्धारण, शुल्क नियामक प्राधिकरणाने करावे. शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ व २०२१-२०२२ करीता ज्या संस्थांनी प्राधिकरणाकडे शुल्क निर्धारीत करण्याकरीता प्रस्ताव सादर केलेले आहेत अशा संस्थांचे चे शुल्क, शुल्क नियामक प्राधिकरणा कडून निर्धारीत करण्यात आले आहेत.

त्या अनुषंगाने ज्या संस्थांना उपरोक्त शासन निर्णयानुसार No Upward revision शुल्काचा पर्याय निवडायचा असल्यास अशा संस्थांनी दि. ३०/१०/२०१८ च्या शासन निर्णयाचे अवलोकन करुन संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करावा. याबाबत शुल्क नियामक प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार करण्यात येऊ नये. याची संबंधित संस्थांनी नोंद घ्यावी.

आदेशानुसार

लहू स. माळी भा.प्र.से.
सचिव
शुल्क नियामक प्राधिकरण
मुंबई

राज्यातील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारण शुल्क नियामक प्राधिकरणाने करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. ईबीसी-२०१८/प्र.क्र.३२६/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०१८

वाचा :- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. १९ मे,२०१८
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२५२/तांशि-४, दिनांक ५ जुलै,२०१८
३) शासन अधिसूचना, क्र.संकीर्ण-२०१५-प्र.क्र.२५२-तांशि-४, दिनांक ५ जुलै,२०१८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विनाअनुदानित व्यावसायिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनिमयन) अधिनियम २०१५ (२०१५ चा महा.२८) दि.१७ ऑगस्ट, २०१५ पासून लागू करण्यात आलेला आहे. या अधिनियमातील कलम २ (द) अन्वये "व्यावसायिक शिक्षण" याचा अर्थ, शासनाने वेळोवेळी व्यावसायिक शिक्षण म्हणून घोषित व अधिसूचित केलेला कोणताही शैक्षणिक पाठ्यक्रम, असा असून त्यामध्ये, कोणत्याही नावाने संबोधला जाणारा व समुचित प्राधिकरणाने मान्यता दिलेला, पदवीपूर्व किंवा पदव्युत्तर पदवी, पदविका देणारा पाठ्यक्रम यांचा समावेश होतो; असे प्रयोजन करण्यात आलेले आहे. सदर अधिनियमातील तरतूदीव्दारे घोषित व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश, प्रवेश नियामक प्राधिकरण अंतर्गत असलेल्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेव्दारे करण्यात येतात. या अधिनियमातील कलम २ (द) मधील तरतूदीनुसार दि.१९मे, २०१८च्या शासन अधिसूचनेन्वये उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विविध अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित केले होते. या अधिसूचनेसोबतच्या अनुसूची क (Schedule A)मध्ये व्यावसायिक पदविका पाठ्यक्रमांपैकी अनुक्रमांक १ येथील - अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका, अनुक्रमांक २ येथील - औषधनिर्माणशास्त्र पदविका व अनुक्रमांक ३ येथील - हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला होता. जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासंबंधीचे अडचणी व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन महाराष्ट्र विना अनुदानित व्यावसायिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ च्या कलम २ (द) सह कलम ३ (१) व (२) नुसार दि.१९ मे, २०१८ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या अधिसूचनेसोबतच्या अनुसूची क (Schedule A) मधील व्यावसायिक पदविका पाठ्यक्रमांपैकी अनुक्रमांक १ येथील - अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका अनुक्रमांक २ येथील - औषधनिर्माणशास्त्र पदविका व अनुक्रमांक ३ येथील - हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान

पदविका हे तीन व्यावसायिक अभ्यासक्रम दि.०५ जुलै, २०१८ च्या अधिसूचनेव्दारे वगळण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

३. राज्यामध्ये सध्या ६५१ इतक्या विना अनुदानित पदविका संस्था आहेत. यापूर्वी या संस्था व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था म्हणून घोषित केल्या असल्यामुळे आतापर्यंत या पदविका अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारण या अधिनियमाखाली गठीत करण्यात आलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करण्यात येत होते. मात्र आता दिनांक ५ जुलै,२०१८ च्या अधिसूचनेमुळे हे पदविका अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून बिगर अधिसूचित झाले असल्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासूनचे विना अनुदानित पदविका अभ्यासक्रमाचे शुल्क निर्धारण शुल्क नियामक प्राधिकरणास करता येणार नाही. मात्र या संस्थांनी अवाजवी शुल्क आकारु नये व त्याचा विद्यार्थ्यांना नाहक आर्थिक भूर्दंड पडू नये याकरीता या पदविका संस्थांचे शुल्क निर्धारण करण्यासाठी व्यवसाय निर्माण करणे गरजेचे होते.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र विनाअनुदानित व्यावसायिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ च्या कलम २२ मधील तरतूदीव्दारे राज्य शासनास असलेल्या अधिकारांचा वापर करुन शासन असे निदेश देत आहे की, "राज्यातील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील ज्या विना अनुदानित व कायम विना अनुदानित अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदविका व हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंतचे शुल्क निर्धारण, शुल्क नियामक प्राधिकरणाने केले आहे अशा संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० वा त्यापुढील कालावधीकरीता अधिक शुल्काची मागणी केल्यास केवळ अशा संस्थांचे शुल्क निर्धारण, शुल्क नियामक प्राधिकरणाने करावे".

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८१०३०१२०७१२५८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=63714fd393d6d5c713e94e6da7 8c6bab2301448b7fc64d130630b9c76aa7 a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.10.30 15:45:57 +05'30'

(संजय औ. धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सर्व मंत्रालयीन प्रशासकिय विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव

४. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
५. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
६. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
७. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, न्यू एक्सेलसिअर बिल्डींग, फोर्ट, मुंबई-४००००१
८. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, न्यू एक्सेलसिअर बिल्डींग, फोर्ट, मुंबई-४००००१
९. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१०. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
१८. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
१९. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२०. सर्व जिल्हाधिकारी
२१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर
२२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर
२३. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
२४. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२५. अवर सचिव (तांशि-३, विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२६. कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
२८. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
२९. निवडनस्ती/तांशि-४.